# Insurance Agents (Life) Question Bank - Marathi

| S. No. | Question Body | Alternative-1 | Alternative-2 | Alternative-3 | Alternative-4 | Correct Alternative |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | आयुर्विमा पॉलिसींमध्ये अंतर्भूत केलेल्या, अ-विवाद-योग्य कलमाच्या अंतर्गत, कोण संरक्षित केले गेले आहे? | विमा-कर्ता | विमा-कृत | विमा प्रतिनिधी | विमा दलाल | 2 |
| 2 | विमा कायद्याचे कलम ४५ (अ-विवाद-योग्य कलम), विमाकर्त्याने विमा-दावा फेटाळण्यापासून विमा-कृत व्यक्तिचे संरक्षण करते, जर पॉलिसीची --- पूर्ण झालेली असली पाहिजेत. सर्वाधिक योग्य पर्याय निवडा. | एक वर्ष | तीन वर्षे | पाच वर्षे | सात वर्षे | 2 |
| 3 | आत्महत्या कलमानुसार, जर, आत्महत्येमुळे, विमा-कृत व्यक्तीचा मृत्यु, पॉलिसी जारी केल्याच्या ३ वर्षांनंतर, झाल्यास, लाभार्थीला, विमा-दावा म्हणून काय मिळते? | कांहीही नाही. | विमा-कृत व्यक्तीने अदा केलेले विमा-हप्ते. | विमा-कृत व्यक्तीने अदा केलेले विमा-हप्ते × २. | पॉलिसीचे संपूर्ण दर्शनी-मूल्य. | 4 |
| 4 | पहिल्या हप्त्याची पावती (एफ.पी.आर.) काय दर्शविते? | मुक्त-दृष्टिक्षेप कालावधी संपलेला आहे. | तो, पॉलिसीचा करार सुरु झाला असल्याचा पुरावा आहे. | आता, पॉलिसी रद्द करता येणार नाही. | पॉलिसीला ठराविक रोख-मूल्य प्राप्त झालेले आहे. | 2 |
| 5 | विमा-कर्ता आणि विमा-कृत व्यक्ती यांच्या दरम्यानच्या कराराचा पुरावा असणारा दस्तऐवज ओळखा. | प्रस्ताव-प्रपत्र | विमा-दावा-प्रपत्र | नाम-निर्देशन-प्रपत्र | पॉलिसी-दस्तऐवज | 4 |
| 6 | जर, एखादा विशिष्ट पॉलिसी-दस्तऐवज तयार करताना, जटिल भाषा वापरण्यात आली असेल, आणि त्यामुळे एखादी संदिग्धता निर्माण झाली असेल, तर सर्वसाधारणपणे, त्याचा अर्थ, कसा लावला जाईल? | विमा-धारकास अनुकूल. | विमा-कर्त्यास अनुकूल. | पॉलिसी रद्द घोषित केली जाईल, आणि विमा-धारकांना, व्याजासहित विमा-हप्ते परत करण्यास, विमा-कर्त्यांस सांगितले जाईल. | पॉलिसी रद्द घोषित केली जाईल, आणि विमा-धारकांना कोणत्याही व्याजाशिवाय विमा-हप्ते परत करण्यास, विमा-कर्त्यांस सांगितले जाईल. | 1 |
| 7 | वयाच्या विपर्यासाच्या संदर्भात, वैध पर्याय निवडा:<br>I: वय कमी नमूद केलेले असल्यास, मूळ पॉलिसी, एका कमी रकमे करिता पुन्हा जारी केली जाईल.<br>II: वय अधिक नमूद केलेले असल्यास, सामान्यतः, अदा केलेल्या विमा-हप्त्यांचे पैसे परत केले जातील. | केवळ, I. | केवळ, II. | I व II, दोनही. | I ही नाही, आणि II ही नाही. | 3 |
| 8 | खालील पैकी काय, एका प्रमाणभूत पॉलिसी-दस्तऐवजाचा एक भाग नाही? | पॉलिसी-अनुसूची | प्रमाणभूत तरतुदी | पॉलिसी-विशिष्ट तरतुदी | पॉलिसी जप्त करण्याच्या तरतुदी | 4 |
| 9 | विमा-कर्ता आणि विमा-कृत व्यक्ती यांच्यामधील कराराचा पुरावा, आम्हांला द्या. | प्रस्ताव-प्रपत्र | विमा-दावा-प्रपत्र | नाम-निर्देशन-प्रपत्र | पॉलिसी-दस्तऐवज | 4 |
| 10 | एका मानक पॉलिसी-तरतुदीचे एक उदाहरण, आम्हांला द्या. | करार केला जात असताना, गर्भवती असलेल्या एका महिलेकरिता, गरोदरपणामुळे आलेला मृत्यु, प्रतिबंधित करणारे, एक कलम. | आत्महत्या कलम. | विशिष्ट आजार, प्रतिबंधित करणारे, एक कलम. | पॉलिसी-धारकांना ठराविक विशेषाधिकार देणारे, एक कलम. | 2 |
| 11 | एका पॉलिसी-विशिष्ट तरतुदीचे एक उदाहरण, आम्हांला द्या. | विमा-हप्ता भरणे. | वयाचे चुकीचे कथन. | विमा-दाव्याची तरतूद. | करार केला जात असताना, गर्भवती असलेल्या एका महिलेकरिता, गरोदरपणामुळे आलेला मृत्यु, प्रतिबंधित करणारे, एक कलम. | 4 |
| 12 | खालील पैकी काय, एका प्रमाणभूत विमा पॉलिसी दस्तऐवजाचा पहिला भाग असतो? | पॉलिसी अनुसूची | प्रमाणभूत तरतुदी | पॉलिसी-विशिष्ट तरतुदी | दावा-कार्यपद्धति | 1 |

| S. No. | Question Body | Alternative-1 | Alternative-2 | Alternative-3 | Alternative-4 | Correct Alternative |
|---|---|---|---|---|---|---|
| 13 | अचूक विधान निवडा. | पॉलिसी-दस्तऐवज हा सक्षम अधिकाऱ्यांनी स्वाक्षरी केलेला असावा; मात्र, भारतीय मुद्रांक कायद्यानुसार मुद्रांकन केलेलाच असण्याची आवश्यकता नाही. | पॉलिसी-दस्तऐवज हा सक्षम अधिकाऱ्यांनी स्वाक्षरी केलेला असावा; आणि भारतीय मुद्रांक कायद्यानुसार मुद्रांकन केलेला असावा. | पॉलिसी-दस्तऐवज हा सक्षम अधिकाऱ्यांनी स्वाक्षरी केलेलाच असण्याची आवश्यकता नाही; मात्र, भारतीय मुद्रांक कायद्यानुसार मुद्रांकन केलेला असावा. | पॉलिसी-दस्तऐवज हा सक्षम अधिकाऱ्यांनी स्वाक्षरी केलेलाच असण्याचीही आवश्यकता नाही; आणि, भारतीय मुद्रांक कायद्यानुसार मुद्रांकन केलेला असण्याचीही आवश्यकता नाही. | 2 |
| 14 | जर, विमा-कृत व्यक्तीने, आयुर्विमा पॉलिसीचा मूळ दस्तऐवज हरविला, तर काय होईल? | विमा कंपनी, करारात कोणतेही बदल न करता, पॉलिसीची एक नक्कल-प्रत जारी करेल. | विमा करार, संपुष्टात येईल. | विमा कंपनी, आयुर्विमा-कृत व्यक्तीच्या सध्याच्या आरोग्य-घोषणांच्या आधारे, नव्या अटी व शर्तींसह, पॉलिसीची एक नक्कल-प्रत जारी करेल. | विमा कंपनी, करारात कोणतेही बदल न करता, पॉलिसीची एक नक्कल-प्रत जारी करेल; परंतु, केवळ न्यायालयाच्या आदेशानंतरच. | 1 |
| 15 | खालील दस्तऐवजांपैकी कोणते, पहिल्या विमा-हप्त्यानंतरचे विमा-हप्ते प्राप्त केल्यानंतर, विमा-कंपनीद्वारे जारी केले जाईल? | पुनरुज्जीवन विमा-हप्त्याची पावती | पुनर्स्थापना विमा-हप्त्याची पावती | बहाली विमा-हप्त्याची पावती | नूतनीकरण विमा-हप्त्याची पावती | 4 |
| 16 | पॉलिसीला खात्रीशीर अभ्यर्पण-मूल्य (जी.एस.व्ही.) प्राप्त होण्याकरिता, विनियमांनुसार, किती काळाकरिता, विमा-हप्ते भरले असलेच पाहिजेत? | सलग २ वर्षे | सलग ४ वर्षे | सलग ३ वर्षे | सलग ५ वर्षे | 3 |
| 17 | एका आयुर्विमा पॉलिसीकरिता, विमा कायदा, १९३८, च्या --- अंतर्गत, नाम-निर्देशनास परवानगी दिली जाते. | कलम १० | कलम ३८ | कलम ३९ | कलम ४५ | 3 |
| 18 | अशी परिस्थिती ओळखा, ज्यामध्ये, पॉलिसी-धारकाला एका नियुक्त व्यक्तीची नियुक्ती करण्याची आवश्यकता असेल. | विमा-कृत व्यक्ती हे एक अल्पवयीन आहेत. | नाम-निर्देशित व्यक्ती हे एक अल्पवयीन आहेत. | पॉलिसी-धारक हे स्वस्थ मनःस्थितीचे नाहीत. | पॉलिसी-धारक हे विवाहित नाहीत. | 2 |
| 19 | अनुग्रह-कालावधीचा हेतू स्पष्ट करा. | हा एक असा कालावधी आहे, ज्याच्या मध्ये, पॉलिसी-धारक, पॉलिसी रद्द करु शकतात, जर त्यांना ती आवडली नसेल. | हा, पॉलिसी-धारकांना, त्यांचा विमा-हप्ता भरण्याकरिता, एक अतिरिक्त अवधी देतो. | हा, असा एक अवधी देतो, ज्याच्या मध्ये, पॉलिसी-धारकांनी, कोणत्याही तक्रारीच्या बाबतीत, एक तक्रार दाखल करावयासच हवी असते. | हा, असा एक अवधी देतो, ज्याच्या नंतर, पॉलिसी-धारकांनी त्यांचे थकित विमा-हप्ते भरावयासच हवे असतात. | 2 |
| 20 | नाम-निर्देशनाच्या संदर्भात, खालील विधानांपैकी सर्व, '---' चा अपवाद वगळता, खरी आहेत. | जर, एका कर्जाच्या मोबदल्यात, विमा-कर्त्यांना पॉलिसी अभिहस्तांकित केलेली असेल, तर, पॉलिसी-नाम-निर्देशन रद्द होत नाही. | पॉलिसी खरेदी करताना किंवा त्यानंतर, नाम-निर्देशन करता येते. | पॉलिसीमध्ये एक पृष्ठांकन करुन, नाम-निर्देशन बदलता येते. | एका नाम-निर्देशित व्यक्तिचा, संपूर्ण विमा-दाव्यावर संपूर्ण हक्क असतो. | 4 |
| 21 | एखादी पॉलिसी निरस्त झाल्याचे कधी मानले जाते? | जर, विमा-हप्ते, देय-तारखेला दिलेले नसतील. | जर, विमा-हप्ते, देय-तारखेपूर्वी दिलेले नसतील. | जर, विमा-हप्ते, अनुग्रह-अवधी नंतर देखील, दिलेले नसतील. | जर, पॉलिसी अभ्यर्पित केलेली असेल. | 3 |
| 22 | अशी परिस्थिती सांगा, ज्यामध्ये, पुनरुज्जीवनाच्या वेळी विमा-योग्यतेचा पुरावा आवश्यक करेल. | पॉलिसी निरस्त झाल्यानंतर, एक आठवडा झाला आहे. | एक वर्षाहून अधिक काळापासून, पॉलिसी निरस्त झालेली आहे. | पॉलिसी एका वर्षाकरिता, प्रभावी आहे. | पॉलिसीवर कर्ज घेण्यात आले आहे. | 2 |
| 23 | पॉलिसी कर्जांच्या समर्थनार्थ, एक वैध वितर्क तयार करा. | कितीही रकमेचे एखादे कर्ज, सहजपणे, मिळविता येते. | विमा-कृत, कर्जाच्या अटी व शर्ती निश्चित करु शकतात. | कर्जाची परतफेड करण्याचे कोणतेही कायदेशीर बंधन नसते. | कोणतेही आनुषंगिक तारण आवश्यक नसते. | 3 |

| S. No. | Question Body | Alternative-1 | Alternative-2 | Alternative-3 | Alternative-4 | Correct Alternative |
|---|---|---|---|---|---|---|
| 24 | अनुग्रह-कालावधीच्या बाबत, अचूक विधान निवडा. सर्वाधिक योग्य पर्याय निवडा. | अनुग्रह-कालावधीचा सर्वसाधारण अवधी, हा १ महिना किंवा ३१ दिवसांचा असतो. | अनुग्रह-कालावधीचा सर्वसाधारण अवधी, हा १ तिमाहीचा असतो. | अनुग्रह-कालावधीचा सर्वसाधारण अवधी, हा १ आठवड्याचा असतो. | अनुग्रह-कालावधीचा सर्वसाधारण अवधी, हा १ पंधरवड्याचा असतो. | 1 |
| 25 | खालील फेरफारांपैकी कशाला, एखादी विमा कंपनी परवानगी देईल? | पॉलिसीचे २ किंवा अधिक पॉलिसींमध्ये विभाजन करणे. | विमा-हप्ता भरण्याच्या मुदतीत वाढ. | नफा-सहित पॉलिसीचे नफा-रहित पॉलिसीमध्ये रुपांतर करणे. | विमा-रकमेत वाढ | 1 |
| 26 | अभ्यर्पण-मूल्याची संकल्पना समजावून सांगा. | पॉलिसीच्या अंतर्गत उपलब्ध असलेली कमाल नुकसान-भरपाई. | कमीत कमी ३ वर्षे, विमा-हप्ते भरण्यात आलेले असल्यास, पॉलिसीशी संबंधित रोख-मूल्य. | पॉलिसीच्या अंतर्गत उपलब्ध असलेली किमान नुकसान-भरपाई. | कोणत्याही दिलेल्या एका वेळेवर, पॉलिसीच्या अंतर्गत उपलब्ध असलेली नुकसान-भरपाई. | 2 |
| 27 | एका पॉलिसीच्या अंतर्गत, किती व्यक्ती नाम-निर्देशित करता येतात? सर्वाधिक योग्य पर्याय निवडा. | नेमके एक. | नेमके दोन. | नेमके तीन. | एक, किंवा एकापेक्षा अधिक. | 4 |
| 28 | नाम-निर्देशनाचा हेतू स्पष्ट करा. | पॉलिसीचे हक्क, अंतरित करणे. | आयुर्विमा-कृत व्यक्तीच्या मृत्यूच्या घटनेत, पॉलिसी-रक्कम प्राप्त करण्याकरिता, एक व्यक्ती नियुक्त करणे. | पॉलिसी अभ्यर्पित करणे. | एक मालमत्ता निर्माण करणे. | 2 |
| 29 | अभिहस्तांकनाचा हेतू स्पष्ट करा. | पॉलिसीचे हक्क, अंतरित करणे. | आयुर्विमा-कृत व्यक्तीच्या मृत्यूच्या घटनेत, पॉलिसी-रक्कम प्राप्त करण्याकरिता, एक व्यक्ती नियुक्त करणे. | पॉलिसी अभ्यर्पित करणे. | एक मालमत्ता निर्माण करणे. | 1 |
| 30 | पॉलिसीच्या सामान्य पुनरुज्जीवनामध्ये समाविष्ट असलेली प्रक्रिया, वर्णन करा. | एक नवीन पॉलिसी जारी करणे, जिची प्रारंभ-तारीख, निरस्त झालेल्या पॉलिसीच्या मूळ प्रारंभ-तारखेपासून, २ वर्षांच्या आतील असेल. | व्याजासहित, थकबाकीचा भरणा करणे. | पुनरुज्जीवनासाठीचा मोबदला म्हणून, निरस्त झालेल्या पॉलिसीवर कर्ज घेणे. | विमा-हप्त्यांची थकबाकी, हप्त्या-हप्त्यांनी देणे. | 2 |
| 31 | खालील दस्तऐवजांपैकी कोणते एक, वयाचा प्रमाणभूत दाखला म्हणून स्वीकारला जात नाही? | शाळा सोडल्याचे प्रमाण-पत्र | पार-पत्र | जन्म-कुंडली | नियोक्त्याचे प्रमाण-पत्र | 3 |
| 32 | 'विपरित-निवड' याच्या संदर्भात, खालील विधानांपैकी कोणते एक, बरोबर आहे? | विपरित-निवड ही, विमा कंपनीद्वारे वापरली जाणारी, प्रक्रिया आहे, ज्याद्वारे याची खात्री केली जाते कि, अ-नैतिक विमा-प्रतिनिधींची निवड केली जात नाही. | विपरित-निवड ही लोकांची प्रवृत्ती आहे, ज्यांना नुकसान होण्याची शक्यता अतिशय जास्त आहे अशी शंका असते किंवा माहिती असते; ते विमा घेण्यासाठी व त्या प्रक्रियेत नफा मिळविण्यासाठी अतिशय अधीर असतात. | विपरित-निवड ही, विमा कंपनीद्वारे वापरली जाणारी, प्रक्रिया आहे, ज्याद्वारे याची खात्री केली जाते कि, संभाव्य पॉलिसी-धारकांसाठी योग्य नसणारी विमा उत्पादने, सादर केली जाणार नाहीत. | विपरित-निवड ही, विमा कंपनीद्वारे वापरली जाणारी, प्रक्रिया आहे, ज्याद्वारे याची खात्री केली जाते कि, पॉलिसी-धारकांकडून गोळा केलेले विमा-हप्ते गुंतविण्याकरिता, चुकीची गुंतवणूक-उत्पादने निवडली जाणार नाहीत. | 2 |
| 33 | खालील व्यक्तींपैकी कोण, विमा कंपन्यांच्या द्वारे, उच्च-जोखीम मानल्या जातात? सर्वाधिक योग्य पर्याय निवडा. | व्यक्ती, ज्या, नियमितपणे 'पान मसाला' सेवन करतात. | दारुला किंवा मादक पेयांना स्पर्शही न करणारा. | व्यक्ती, ज्या, उपशामक व इतर उत्तेजक पदार्थांच्या प्रभावाखाली असतात. | व्यक्ती, ज्या, नियमितपणे, मांसाहारी अन्न सेवन करतात. | 3 |
| 34 | खालील पैकी कोणाला, त्यांच्या व्यवसायामध्ये, आरोग्याचा धोका असण्याची शक्यता आहे? | योग-शिक्षक | चित्रपटातील थरारदृश्ये करणारे कलाकार | एका नाईट-क्लबमधील नर्तक | खाणीतील धुळीशी संपर्क येणारी व्यक्ती | 4 |

| S. No. | Question Body | Alternative-1 | Alternative-2 | Alternative-3 | Alternative-4 | Correct Alternative |
|---|---|---|---|---|---|---|
| 35 | खालील पैकी कोणाला, त्यांच्या व्यवसायामध्ये, अपघाताचा धोका असण्याची शक्यता आहे? सर्वाधिक योग्य पर्याय निवडा. | वैद्यकीय व्यावसायिक | पर्यटकांचा मार्गदर्शक | बांधकाम तोडण्यासंदर्भातील तज्ञ | विपणन कर्मचारी, जे नियमितपणे बाहेर काम करतात | 3 |
| 36 | --- म्हणजे, जर, आयुर्विमा-कृत व्यक्तीचा, ठराविक कालावधीमध्ये, एखाद्या विशिष्ट कारणामुळे मृत्यू झाल्यास, मृत्यू-लाभाची घटलेली रक्कमच देय असेल. | मर्त्यता-दर | धारणाधिकार | विपरित-निवड | गहाण | 2 |
| 37 | जोखीम-अंकनाच्या सांख्यिक गुणांकन पद्धतीच्या संदर्भात, खालील विधानांपैकी कोणते एक, चूक आहे? | या पद्धतीच्या अंतर्गत, जोखीम-अंकन-कर्ता, सर्व नकारात्मक किंवा प्रतिकूल घटकांसाठी, धनात्मक दर्जांकन लागू करतात. | या पद्धतीच्या अंतर्गत, जोखीम-अंकन-कर्ता, सर्व सकारात्मक किंवा अनुकूल घटकांसाठी, धनात्मक दर्जांकन लागू करतात. | या पद्धतीच्या अंतर्गत, असे लागू करण्यात आलेले, एकूण गुण, त्यास किती अतिरिक्त-मर्त्यता-दर्जांकन (ई.एम.आर.) देण्यात आलेले आहे, हे ठरवितात. | या पद्धतीच्या अंतर्गत, जर, अतिरिक्त-मर्त्यता-दर्जांकन (ई.एम.आर.), हे खूप जास्त असेल, तर, विमा नाकारला देखील जाऊ शकतो. | 2 |
| 38 | जोखीम-अंकनाच्या न्याय-निर्णय पद्धतीच्या संदर्भात, खालील विधानांपैकी कोणते एक, चूक आहे? | या पद्धतीच्या अंतर्गत, व्यक्ति-निष्ठ निर्णय वापरले जातात. | ही पद्धत, विशेषतः, जटील प्रकरणांच्या बाबतीत वापरली जाते. | या पद्धतीमध्ये, कंपनी, वैद्यकीय डॉक्टरांचे तज्ञ मत घेऊ शकते. | या पद्धतीमध्ये, जोखीम-अंकनकर्ता, प्रतिकूल घटकांना, धनात्मक किंवा ऋणात्मक दर्जांकन-गुण लागू करतात. | 4 |
| 39 | श्री. विमल, हे, ३२ वर्षे वयाचे, निरोगी, धूम्रपान न करणारे, दारुला किंवा मादक पदार्थांना स्पर्शही न करणारे, व्यक्ती आहेत, ज्यांनी, ए.बी.सी. मर्यादित विमा कंपनी कडून आयुर्विम्याकरिता अर्ज केलेला आहे. खालील विधानांपैकी कोणते एक, विमा कंपनीद्वारा जोखीम-स्वीकृतीच्या बाबतीत, खरे ठरेल? | जोखीम, सामान्य दराने स्वीकारली जाईल. | कोष्टकातील हप्त्यांच्या दरावर अतिरिक्त दर आकारुन, जोखीम स्वीकारली जाईल. | जोखीम, विमा-राशिवर धारणाधिकारासहित, स्वीकारली जाईल. | जोखीम, प्रतिबंधात्मक कलमांसह स्वीकारली जाईल. | 1 |
| 40 | जर, श्री. ब्रिजेश, एक ४० वर्षीय व्यक्ती, विमा कंपनी द्वारे, एक 'उप-मानक जोखीम' म्हणून मानले गेलेले आहेत, तर, खालील विधानांपैकी कोणते एक, विमा कंपनी द्वारे जोखीम-स्वीकृतीच्या बाबतीत, खरे ठरेल? | जोखीम, सामान्य दराने स्वीकारली जाईल. | जोखीम, कमी दराने स्वीकारली जाईल. | कोष्टकातील हप्त्यांच्या दरावर अतिरिक्त दर आकारुन, जोखीम स्वीकारली जाईल. | जोखीम, फेटाळली जाईल. | 3 |
| 41 | 'जोखीम-वर्गीकरण' म्हणजे काय? सर्वाधिक योग्य पर्याय निवडा. | एक अशी प्रक्रिया, जिच्यामध्ये, व्यक्तिगत जीवने, त्यांनी दर्शविलेल्या जोखीमांच्या प्रमाणानुसार, वर्गीकृत केली जातात, आणि विविध जोखीम-वर्गांमध्ये समाविष्ट केली जातात. | अशा लोकांची प्रवृत्ती, ज्यांना नुकसान होण्याची शक्यता अतिशय जास्त आहे अशी शंका असते किंवा माहिती असते; ते विमा घेण्यासाठी व त्या प्रक्रियेत नफा मिळविण्यासाठी अतिशय अधीर असतात. | आयुर्विम्यासाठीच्या प्रत्येक प्रस्तावाचे, त्यांनी दर्शविलेल्या जोखीमेच्या प्रमाणाच्या संदर्भात मूल्यमापन करण्याची; आणि नंतर, विमा देण्याचे किंवा न देण्याचे आणि कोणत्या अटींवर देण्याचे ठरविण्याची प्रक्रिया. | एक अशी प्रक्रिया, जिच्यामध्ये, अर्जदार, जे जोखीमेच्या समान प्रमाणांचा सामना करतात, तशाच समान विमा-हप्ता-श्रेणीत समाविष्ट केले जातात. | 1 |
| 42 | --- म्हणजे, अर्जदार, जे, समान प्रकारच्या जोखीमांचा सामना करतात, त्यांना एकाच विमा-हप्ता-श्रेणीत बसविले पाहिजेत. | जोखीम-निवड | प्रतिकूल-निवड | नैतिक धोका | न्याय-संगतता | 4 |

| S. No. | Question Body | Alternative-1 | Alternative-2 | Alternative-3 | Alternative-4 | Correct Alternative |
|---|---|---|---|---|---|---|
| 43 | खालील विधानांपैकी कोणते एक, जोखीम वर्गीकरणाच्या अंतर्गत, 'उप-मानक जीविते' यांच्या संदर्भात, बरोबर आहे? सर्वाधिक योग्य पर्याय निवडा. | उप-मानक जीवितांमध्ये, अशा व्यक्तींचा समावेश असतो, ज्यांची अनुमानित मर्त्यता, ही, मर्त्यता-कोष्टकाद्वारे प्रतिनिधित्व केलेल्या, मानक जीवितांच्या एवढी असते. | उप-मानक जीवितांमध्ये, अशा व्यक्तींचा समावेश असतो, ज्यांची अनुमानित मर्त्यता, ही, मर्त्यता-कोष्टकाद्वारे प्रतिनिधित्व केलेल्या, मानक जीवितांपेक्षा लक्षणीय रीत्या कमी असते, आणि म्हणूनच, एक कमी हप्ता, त्यांना आकारला जाऊ शकतो. | उप-मानक जीवितांमध्ये, अशा व्यक्तींचा समावेश असतो, ज्यांची अनुमानित मर्त्यता, ही सरासरी जीविते किंवा मानक जीविते, यांच्यापेक्षा अधिक असते, मात्र तरी देखील त्यांना विमा-योग्य मानले जाते. | उप-मानक जीवितांमध्ये, अशा व्यक्तींचा समावेश असतो, ज्यांच्या शारीरिक दुर्बलता आणि अनुमानित मर्त्यता, या इतक्या जास्त असतात, की, त्यांना एका परवडणाऱ्या दराने, विमा-संरक्षण देता येत नाही. | 3 |
| 44 | खालील विधानांपैकी कोणते एक, जोखीम वर्गीकरणाच्या अंतर्गत, 'नाकारलेली जीविते' यांच्या संदर्भात, बरोबर आहे? | नाकारलेल्या जीवितांमध्ये, अशा व्यक्तींचा समावेश असतो, ज्यांची अनुमानित मर्त्यता, ही, मर्त्यता-कोष्टकाद्वारे प्रतिनिधित्व केलेल्या, मानक जीवितांच्या एवढी असते. | नाकारलेल्या जीवितांमध्ये, अशा व्यक्तींचा समावेश असतो, ज्यांच्या शारीरिक दुर्बलता आणि अनुमानित मर्त्यता, या इतक्या जास्त असतात, की, त्यांना एका परवडणाऱ्या दराने, विमा-संरक्षण देता येत नाही. | नाकारलेल्या जीवितांमध्ये, अशा व्यक्तींचा समावेश असतो, ज्यांची अनुमानित मर्त्यता, ही सरासरी जीविते किंवा मानक जीविते, यांच्यापेक्षा अधिक असते, मात्र तरी देखील त्यांना विमा-योग्य मानले जाते. | नाकारलेल्या उप-मानक जीवितांमध्ये, अशा व्यक्तींचा समावेश असतो, ज्यांची अनुमानित मर्त्यता, ही, मर्त्यता-कोष्टकाद्वारे प्रतिनिधित्व केलेल्या, मानक जीवितांपेक्षा लक्षणीय रीत्या कमी असते, आणि म्हणूनच, एक कमी हप्ता, त्यांना आकारला जाऊ शकतो. | 2 |
| 45 | जर एखादी विमा कंपनी, विमा-राशीवरील धारणाधिकारासह, एखादी जोखीम स्वीकारत असेल, तर त्याचा अर्थ काय होतो? | धारणाधिकार म्हणजे, जर आयुर्विमा-कृत व्यक्ति, जीवनाच्या एका ठराविक कालावधीमध्ये, एका विशिष्ट कारणाने मृत झाल्यास, मृत्य-लाभाची घटलेली रक्कमच देय असेल. | धारणाधिकार म्हणजे, कंपनीद्वारे, मर्यादित काळासाठीच, जोखीम स्वीकारली जाते आहे. | धारणाधिकार म्हणजे, विमा कंपनी, कोष्टकीय विमा-हप्त्यांच्या तुलनेत, कमी दराने जोखीम स्वीकारते आहे. | धारणाधिकार म्हणजे, एका विशिष्ट कालावधीपर्यंत, विमा-प्रस्ताव, लांबणीवर टाकला जातो आहे. | 1 |
| 46 | जर, विमा-कृत व्यक्ती, पॉलिसीच्या संपूर्ण मुदतीत जिवंत राहिली, तर, मुदतीच्या शेवटी, विमा-कृत व्यक्तीला, एक निर्दिष्ट रक्कम देण्याचे वचन, जेंव्हा, विमा-कर्ता देतात, तेंव्हा, त्या विमा-दाव्याला --- असे म्हणतात. | विद्यमानता-लाभ | पॉलिसी अभ्यर्पण | मृत्यू विमा-दावा | मुदत-पूर्ती विमा-दावा | 4 |
| 47 | जर, विमा कंपनी, विमा-कृत व्यक्तीला, पॉलिसीच्या मुदतीच्या दरम्यान, ठराविक कालावधी नंतर, निर्धारित रक्कम देत असेल, तर, ही रक्कम --- यानुसार दिलेली असते. | विद्यमानता-लाभ | अभ्यर्पण-मूल्य | ऐच्छिक आणि अतिरिक्त लाभ (रायडर) | सशर्त अभिहस्तांकन | 1 |
| 48 | एका आयुर्विमा कंपनीने, पॉलिसी-मुदतीच्या दरम्यान, विमा-कृत व्यक्तीच्या रुग्णालय-भर्तीच्या घटनेमध्ये, विमा-कृत व्यक्तीला, उपचाराचा खर्च दिलेला आहे. हे --- चे एक उदाहरण आहे. | विद्यमानता-लाभ | अभ्यर्पण-मूल्य | ऐच्छिक आणि अतिरिक्त लाभ (रायडर) | सशर्त अभिहस्तांकन | 3 |

| S. No. | Question Body | Alternative-1 | Alternative-2 | Alternative-3 | Alternative-4 | Correct Alternative |
|---|---|---|---|---|---|---|
| 49 | ए.बी.सी. विमा कंपनीने श्री. कृष्णा यांना विद्यमानता-विमा-दाव्याच्या तरतुदीसहित, एक विमा योजना देऊ केली आहे. कंपनी, विद्यमानता-विमा-दाव्याची खातरजमा, कशी करेल? सर्वाधिक योग्य पर्याय निवडा. | पॉलिसीमध्ये विहित केलेल्या, अटींनुसार, विमा-दाव्याची खातरजमा केली जाईल. | विमा-दाव्याची खातरजमा, तारखांच्या आधारे, ज्या, कराराच्या सुरुवातीलाच निश्चित केलेल्या असतात, केली जाईल. | विमा-दावा केला जाईल, जेंव्हा, पॉलिसी-धारक, करार रद्द करण्याचा निर्णय घेतील. | पॉलिसी-धारकांनी, त्यांच्या दाव्याच्या समर्थनार्थ दिलेल्या, वैद्यकीय व इतर नोंदींच्या आधारे, दावे निश्चित केले जातील. | 1 |
| 50 | श्रीमती कविता यांनी, ए.बी.सी. विमा कंपनीकडून, मुदतीच्या विमा योजनेसहित, एक गंभीर आजार (सी.आय.) ऐच्छिक आणि अतिरिक्त लाभ (रायडर) खरेदी केलेला आहे. कंपनी, गंभीर आजार (सी.आय.) ऐच्छिक आणि अतिरिक्त लाभ (रायडर) दाव्याची खातरजमा कशा प्रकारे करेल? सर्वाधिक योग्य पर्याय निवडा. | पॉलिसीमध्ये विहित केलेल्या, अटींनुसार, विमा-दाव्याची खातरजमा केली जाईल. | विमा-दाव्याची खातरजमा, तारखांच्या आधारे, ज्या, कराराच्या सुरुवातीलाच निश्चित केलेल्या असतात, केली जाईल. | विमा-दावा केला जाईल, जेंव्हा, पॉलिसी-धारक, करार रद्द करण्याचा निर्णय घेतील. | पॉलिसी-धारकांनी, त्यांच्या दाव्याच्या समर्थनार्थ दिलेल्या, वैद्यकीय व इतर नोंदींच्या आधारे, दावे निश्चित केले जातील. | 4 |
| 51 | --- म्हणजे, करारामध्ये नमूद केलेले वचन, विमाकर्त्यांनी पूर्ण करावे, अशी मागणी होय. | विमा-दावा | अ-स्वीकार | मुदतपूर्व बंद | गाऱ्हाणे | 1 |
| 52 | पॉलिसी ‘अभ्यर्पित’ करण्यासंदर्भात, खालील विधानांपैकी कोणते, चुकीचे आहे? | विमा-कृत व्यक्तीला देय असलेले अभ्यर्पण-मूल्य, सामान्यतः, अदा केलेल्या हप्त्यांच्या कांही एक प्रतिशत (टक्के) असते. | एखाद्या पॉलिसीने प्रदत्त-मूल्य प्राप्त केले असेल तरच, ती अभ्यर्पित करता येते. | विमा-धारकाला दिलेले प्रत्यक्ष अभ्यर्पण-मूल्य, सकल अभ्यर्पण-मूल्यापेक्षा नेहमी कमी असते. | विमा-कृत व्यक्तीने, पॉलिसी स्वेच्छेने रद्द केल्यास, अभ्यर्पण-मूल्य देय असते. | 3 |
| 53 | गंभीर आजार (सी.आय.) ऐच्छिक आणि अतिरिक्त लाभ (रायडर) याच्या संदर्भात, खालील विधानांपैकी कोणते एक, चूक आहे? सर्वाधिक योग्य पर्याय निवडा. | एखाद्या गंभीर आजाराचे निदान झाल्यास, पॉलिसी-अटींच्या अनुसार, एक विशिष्ट रक्कम दिली जाते. | विमा कंपनीने निर्दिष्ट केलेल्या, गंभीर आजारांच्या यादीत अंतर्भूत असलेला, आजार असावयास हवा. | गंभीर आजार (सी.आय.) ऐच्छिक आणि अतिरिक्त लाभ (रायडर) हे अशा विमा-दाव्यांचे एक उदाहरण आहे, जे, पॉलिसी-कालावधीत होऊ शकतात. | ऐच्छिक आणि अतिरिक्त लाभ (रायडर) याची रक्कम अदा केल्यानंतर, आयुर्विमा पॉलिसी करार रद्द होतो. | 4 |
| 54 | श्री. निमेश यांनी, 20 वर्षांची युनिट-संलग्न विमा योजना खरेदी केलेली होती. श्री. निमेश यांचा मृत्यु, पॉलिसी-कालावधीत होण्याच्या घटनेत, खालील पैकी काय दिले जाईल? | अभ्यर्पण-मूल्य | थकबाकी वजा केल्यानंतर, अदा केलेले हप्ते | विमा-रक्कम किंवा निधी-मूल्य यांपैकी, जे कमी असेल ते | विमा-रक्कम किंवा निधी-मूल्य यांपैकी, जे जास्त असेल ते | 4 |
| 55 | जर, विमा-कृत व्यक्तीने, प्रस्ताव-प्रपत्रात सादर केलेली महत्वपूर्ण तथ्ये खोटी असतील, तर, असा कालावधी किती आहे, ज्याच्या पर्यंत, विमा कंपनी, एखादी पॉलिसी नाकारु शकते? | १५ दिवसांपर्यंत | ६ महिन्यांपर्यंत | १ वर्षापर्यंत | ३ वर्षांपर्यंत | 4 |
| 56 | भारतीय विमा नियामक आणि विकास प्राधिकरण (आय.आर.डी.ए.आय.) (पॉलिसी-धारकांच्या हितसंबंधांचे संरक्षण) नियम, २०१७, नुसार, ठराविक कालावधी किती आहे, ज्याच्या आत, एखाद्या आयुर्विमा पॉलिसीच्या अंतर्गत, विमा-दाव्याची रक्कम अदा करावी लागेल किंवा विवादित करता येईल, जर, विमा कंपनीला सर्व संबंधित दस्तऐवज मिळाले असतील? | १५ दिवसांच्या आत | २० दिवसांच्या आत | ३० दिवसांच्या आत | ३ महिन्यांच्या आत | 3 |
| 57 | आयुर्विमा-कृत व्यक्तीच्या मृत्युच्या अनुमानाच्या बाबतीत, नाम-निर्देशित व्यक्तीला, खालील दस्तऐवजांपैकी कोणते एक, सादर करणे आवश्यक असते? | महानगरपालिकेकडील मृत्यू-प्रमाण-पत्र. | एका सक्षम न्यायालयाकडून हुकुम. | नियोक्त्यांचे प्रमाण-पत्र. | मृत्यूच्या कारणांच्या अधिकृत चौकशीचा अहवाल. | 2 |

| S. No. | Question Body | Alternative-1 | Alternative-2 | Alternative-3 | Alternative-4 | Correct Alternative |
|---|---|---|---|---|---|---|
| 58 | श्री. ब्रिजेश यांनी, ए.बी.सी. विमा कंपनीकडून, 20 वर्षांची युनिट-संलग्न विमा योजना (यू.एल.आय.पी.) खरेदी केलेली होती. जर, श्री. ब्रिजेश यांचा मृत्यू, पॉलिसीच्या मुदत-पूर्तीपूर्वी झाला, तर विमा कंपनीला --- द्यावे लगेल. | अभ्यर्पण-मूल्य | थकबाकी वजा केल्यानंतर, अदा केलेले हप्ते | विमा-रक्कम किंवा निधी-मूल्य यांपैकी, जे कमी असेल ते | विमा-रक्कम किंवा निधी-मूल्य यांपैकी, जे जास्त असेल ते | 4 |
| 59 | खालील दाव्यांपैकी कोणता, केवळ नामनिर्देशित व्यक्ती किंवा अभिहस्तांकित व्यक्ती यांनाच देय असतो? | मृत्यू विमा-दावा | मुदत-पूर्ती विमा-दावा | विद्यमानता-लाभ | अभ्यर्पण-मूल्य | 1 |
| 60 | नैसर्गिक मृत्युच्या ऐवजी अपघाती मृत्यू झाल्यास, विमा-दाव्याकरिता, खालील दस्तऐवजांपैकी कोणता एक, अतिरिक्त दस्तऐवज सादर करावा लागेल? | दफन किंवा दहन प्रमाण-पत्र | उपचार करणाऱ्या डॉक्टरांचे प्रमाण-पत्र | शव-विच्छेदन अहवाल | नियोक्त्याचे प्रमाण-पत्र | 3 |
| 61 | आयुर्विमा-कृत व्यक्तीचा नैसर्गिक मृत्यू झाल्यास, नाम-निर्देशित व्यक्तीला, खालील दस्तऐवजांपैकी कोणते एक, सादर करावे लागते? सर्वाधिक योग्य पर्याय निवडा. | मृत्यूच्या कारणांच्या अधिकृत चौकशीचा अहवाल | मृत्यु-प्रमाण-पत्र | शव-विच्छेदन अहवाल | प्रथम सूचना अहवाल (एफ.आय.आर.) | 2 |
| 62 | ए.बी.सी. विमा कंपनीकडून, श्री. राहुल यांनी, २० वर्षांच्या कालावधीकरिता, एक विमा-संरक्षण खरेदी केलेले आहे. २० वर्षे पूर्ण झाल्यानंतर, कंपनीने, श्री. राहुल यांना, परिपक्वता-विमा-दावा म्हणून, निधी-मूल्य अदा केलेले आहे. कोणत्या प्रकारची योजना, श्री. राहुल यांनी खरेदी केलेली होती? | सहभागात्मक योजना | विमा-हप्ते परत करणारी योजना | युनिट-संलग्न विमा योजना (यू.एल.आय.पी.) | धन-पुनःप्राप्ती (मनी-बॅक) आयुर्विमा योजना | 3 |
| 63 | श्री. विशाल यांनी, २५ वर्षांच्या कालावधीकरिता, रुपये ५० लाखांचा एक विमा घेतलेला आहे. मुदतपूर्तीनंतर, विमा-कर्त्यांनी, मुदतपूर्ती-दाव्यामधून, पॉलिसीच्या मुदतीत मिळालेले विद्यमानता-लाभ वजा करुन, रक्कम अदा केलेली आहे. कोणत्या प्रकारची योजना, श्री. विशाल यांनी घेतलेली होती? | सहभागात्मक योजना | विमा-हप्ते परत करणारी योजना | युनिट-संलग्न विमा योजना (यू.एल.आय.पी.) | धन-पुनःप्राप्ती (मनी-बॅक) आयुर्विमा योजना | 4 |
| 64 | ए.बी.सी. विमा कंपनीकडून, श्री. सुधीर यांनी, २० वर्षांपूर्वी, रुपये २५ लाखांचे विमा-संरक्षण घेतलेले होते. मुदतपूर्तीनंतर, कंपनीने, श्री. सुधीर यांना, मुदतपूर्तीचा दावा म्हणून, विमा-राशि अधिक संचित अधिलाभांश वजा देय रक्कम (थकित हप्ते), असे अदा केले. कोणत्या प्रकारची योजना, श्री. सुधीर यांनी घेतलेली होती? | सहभागात्मक योजना | विमा-हप्ते परत करणारी योजना | युनिट-संलग्न विमा योजना (यू.एल.आय.पी.) | धन-पुनःप्राप्ती (मनी-बॅक) आयुर्विमा योजना | 1 |
| 65 | श्री. कपील यांनी, २५ वर्षांच्या कालावधीकरिता, रुपये ५० लाखांचे एक विमा-संरक्षण घेतलेले होते. श्री. कपील, पॉलिसीच्या मुदतीत, एका मोटार-गाडी-अपघातात मृत्यू पावले, आणि कंपनीने त्यांच्या नाम-निर्देशित व्यक्तीला, विमा-राशि अधिक संचयित अधिलाभांश, अदा केले. कोणत्या प्रकारचा विमा-दावा, विमा कंपनीद्वारे, अदा केला गेला आहे? | मुदत-पूर्ती विमा-दावा | मृत्यू-विमा-दावा | ऐच्छिक आणि अतिरिक्त (ऐच्छिक आणि अतिरिक्त लाभ (रायडर)) लाभ | विद्यमानता लाभ | 2 |
| 66 | विमा-कर्त्यांना महत्वपूर्ण माहिती का हवी असते? | दस्तऐवजीकरणाच्या हेतूंकरिता. | जोखीमेचा स्वीकार आणि संबंधित शर्ती व अटींविषयी निर्णय घेणे. | विनियामक आवश्यकतांचे पालन करणे. | ग्राहक-सेवा सुधारणे. | 2 |
| 67 | एका वैध कराराचा कोणता घटक, विमा-हप्त्याशी संबंधित असतो? | प्रस्ताव आणि स्वीकार | कराराकरिता पक्षांची क्षमता | मुक्त संमती | मोबदला | 4 |
| 68 | असा पर्याय ओळखा, जो, कोणत्याही फसवणुकीच्या हेतूने करण्यात आलेल्या, चुकीच्या विधानांशी संबंधित आहे. | विचारार्थ सादरीकरण | विपर्यास | जबरदस्ती | फसवणूक | 2 |
| 69 | असा पर्याय ओळखा, जो, एक वैध करार मानता येईल. | श्री. रमेश यांनी अतिशय किरकोळ दरात, त्यांच्या मित्रांकडून मालमत्ता खरेदी केली आहे. | श्री. रमेश यांनी करार केलेला आहे, जेंव्हा ते स्वस्थ मनस्थितीत नव्हते. | श्री. रमेश यांनी एक करार करण्याकरिता, एका अधिकाऱ्याला लाच दिलेली आहे. | श्री. रमेश यांनी चुकीची माहिती दिलेली आहे, जेणेकरुन, श्री. महेश करारावर स्वाक्षरी करतील. | 1 |

| S. No. | Question Body | Alternative-1 | Alternative-2 | Alternative-3 | Alternative-4 | Correct Alternative |
|---|---|---|---|---|---|---|
| 70 | जुगार व विमा, यांची तुलना करा. | जुगार व विमा, दोनही, सारखेच आहेत. | जुगारामध्ये विमा-योग्य-हित नसते, मात्र विम्यामध्ये ते असते. | विम्याचे परिणाम केवळ नफादायक असतात, तर जुगारामुळे नुकसानही होऊ शकते. | जुगार कायद्याने लागू करता येतो; मात्र, विमा करता येत नाही. | 2 |
| 71 | "आसंजनाचे करार", आमच्याकरिता, सारांशित करा. | हे करार, दोनही पक्षांच्या द्वारे तयार केले जातात, आणि ते, दोघांच्या ही द्वारे, स्वीकृत केले गेले पाहिजेत. | हे करार, एका पक्षाच्या द्वारे तयार केले जातात, आणि दुसरा पक्ष, ते केवळ स्वीकारु शकतात किंवा फेटाळू शकतात. | हे करार, एका पक्षाच्या द्वारे तयार केले जातात, आणि दुसऱ्याला ते स्वीकारावेच लागतात. | हे करार, दोनही पक्षांवर बंधनकारक असतात. | 2 |
| 72 | श्री. रमेश यांनी, त्यांची कंपनी विकण्यापूर्वी, त्यांच्या कंपनीच्या ताळेबंदात खोटी माहिती दिलेली आहे. श्री. रमेश यांची ही कृती, खालील पैकी एका पर्यायात वर्गीकृत करा. | चूक | जबरदस्ती | विपर्यास | फसवणूक | 4 |
| 73 | आयुर्विम्याची विषय-वस्तू काय असते? | विमा-हप्ता | मानवी जीवन | मालमत्ता | पत | 2 |
| 74 | एक अशी परिस्थिती निवडा, जी, परमसद्भावाचे तत्व दर्शविते. | विमा-हप्ता, वेळेवर भरणे. | एखाद्या विमा प्रस्ताव-प्रपत्रावर, सर्व महत्वाची माहिती, नमूद करणे. | एखाद्या विमा प्रस्ताव-प्रपत्रावर, सर्व महत्वाची माहिती, खोटी नमूद करणे. | विम्याच्या एका प्रस्ताव-प्रपत्रावर, असंबद्ध महिती नमूद करणे. | 2 |
| 75 | आयुर्विम्याच्या संदर्भात, खालील दोन विधाने पाहा, आणि त्यातील सत्य विधान (विधाने) निवडा.<br>I: वय ही महत्वपूर्ण माहिती आहे, आणि जोखीम-अंकनाच्या अटींना प्रभावित करु शकते.<br>II: जर, वय वेगळे असल्याचे आढळले, तर, केवळ विमा-हप्त्याच्या दरावर परिणाम होतो. | केवळ विधान-I बरोबर आहे. | केवळ विधान-II बरोबर आहे. | विधान-I आणि विधान-II, दोनही, बरोबर आहेत. | विधान-I आणि विधान-II, दोनही, चूक आहेत. | 1 |
| 76 | सामान्य कायद्याच्या अंतर्गत, एखादा करार पूर्ण करण्याकरिता, कारण निवडा. | विफलता | चूक | विपर्यास | लपविणे | 3 |
| 77 | जेंव्हा विमा खरेदी केला जातो, तेंव्हा विमा कराराच्या अटी मांडणाऱ्या दस्तऐवजाचे नांव द्या. सर्वाधिक योग्य पर्याय निवडा. | पॉलिसी | करारनामा | प्राधिकार-पत्र | पृष्ठांकन | 1 |
| 78 | अशा हिताचे नांव द्या, जे विमा-कृत व्यक्तीला, आयुर्विम्याच्या विषय-वस्तू मध्ये असते. सर्वाधिक योग्य पर्याय निवडा. | सट्टेबाजीचे हित | पैजेचे हित | विमायोग्य-हित | क्षति-पूर्ति हित | 3 |
| 79 | विमा-कर्ता व विमा-कृत व्यक्ती यांच्या दरम्यानच्या कराराचे वर्णन, तुम्ही कसे कराल? सर्वाधिक योग्य पर्याय निवडा. | अंतरिम करार | तात्पुरता करार | स्थिर करार | आनुषंगिक करार | 4 |
| 80 | सामान्यतः, कायदेशीर करार आणि विमा करार यांच्यामधील मुख्य फरक, '---', हा, आहे. | विमा करार हे परम सद्भावाचे करार असतात. | विमा करार, हे, कायदेशीर अंमलबजावणी-योग्य करार असतात. | विमा करार, हे, नेहमीच फायदेशीर असतात. | विमा करार, हे, कोणत्याही प्रकारच्या, कोणच्याही नियमनाच्या अधीन नसतात. | 1 |
| 81 | आयुर्विम्याच्या बाबतीत, विमायोग्य-हित अस्तित्वात असणे केंव्हा आवश्यक असते, याची वेळ अथवा स्थान यांबाबत, श्री. राजन यांना सल्ला द्या. | केवळ, पॉलिसी घेण्याच्या वेळेला. | केवळ, विमा-दावा करण्याच्या वेळेला. | पॉलिसी घेण्याच्या वेळेला आणि विमा-दावा करण्याच्या वेळेला. | आयुर्विम्याच्या बाबतीत, कोणतेही विमायोग्य-हित आवश्यक नसते. | 1 |
| 82 | मालमत्ता-विम्याच्या बाबतीत, विमायोग्य-हित अस्तित्वात असणे केंव्हा आवश्यक असते, याची वेळ अथवा स्थान यांबाबत, श्रीमती अनिता यांना सल्ला द्या. | केवळ, पॉलिसी घेण्याच्या वेळेला. | केवळ, विमा-दावा करण्याच्या वेळेला. | पॉलिसी घेण्याच्या वेळेला आणि विमा-दावा करण्याच्या वेळेला. | मालमत्ता विम्याच्या बाबतीत, कोणतेही विमायोग्य-हित आवश्यक नसते. | 3 |
| 83 | श्री. महेश यांनी त्यांच्या घरावर एक विमा पॉलिसी काढलेली आहे. त्यांनी, पॉलिसी घेतल्याच्या कांही महिन्यांच्या नंतर, घर विकले आहे. जर, घराचे कांही नुकसान झाले, तर, श्री. महेश यांना विमा-दाव्याची रक्कम मिळू शकेल काय? | होय, कारण, पॉलिसी घेण्याच्या वेळेला, विमायोग्य-हित अस्तित्वात होते. | होय, जर घराच्या सध्याच्या मालकांनी परवानगी दिली, तर. | होय, जर घर विकल्यानंतर एक वर्षाच्या आत, नुकसान झाले असेल, तर. | नाही, कारण, कोणतेही विमायोग्य-हित अस्तित्वात नाही. | 4 |

| S. No. | Question Body | Alternative-1 | Alternative-2 | Alternative-3 | Alternative-4 | Correct Alternative |
|---|---|---|---|---|---|---|
| 84 | श्री. राजन, हे, एका घोड्यावरुन खाली पडले, आणि एका डबक्यात पडले. त्यांना बराच वेळ डबक्यात पडून राहावे लागलेस कारण, खाली पडल्यामुळे त्यांचा पाय तुटला; याचा परिणाम म्हणून, त्यांना तीव्र फुफ्फुस-दाह (न्यूमोनिया) झाला. त्यांच्यावर जवळच्या रुग्णालयामध्ये उपचार करण्यात आले, जेथे, त्यांचा फुफ्फुस-दाहामुळे मृत्यू झाला. या प्रकरणात, मृत्यूचे सर्वांत जवळचे कारण काय होते? | फुफ्फुस-दाह | पडण्याचा परिणाम म्हणून झालेली, पायाची दुखापत | डॉक्टरांचा निष्काळजीपणा | रुग्णालयाचे उपचार | 2 |
| 85 | श्री. रमेश विवाहित आहेत, आणि त्यांच्या मित्राच्या जीवनावर एक आयुर्विमा संरक्षण विकत घेऊ इच्छित आहेत. ते, तसे करु शकतील काय, हे शोधून काढा. | होय, श्री. रमेश यांना, त्यांच्या मित्राच्या जीवनावर आयुर्विमा संरक्षण खरेदी करता येईल. | नाही, श्री. रमेश यांना त्यांच्या मित्राच्या जीवनावर आयुर्विमा संरक्षण घेता येणार नाही, कारण, ते विवाहित आहेत. | नाही, श्री. रमेश यांना त्यांच्या मित्राच्या जीवनावर आयुर्विमा संरक्षण खरेदी करता येणार नाही, कारण त्यामध्ये विमा-योग्य-हित नाही. | श्री. रमेश यांना 'क्रेता-सावधान' या तत्वानुसार, त्यांच्या मित्राच्या जीवनावर आयुर्विमा संरक्षण खरेदी करता येणार नाही. | 3 |
| 86 | खालील संस्थांपैकी कोणती एक, भारतातील विमा कंपन्यांना विनियमित करते? | भारतीय रिजर्व्ह बँक (आर.बी.आय.) आणि अर्थ मंत्रालय, एकत्रितपणे. | भारतीय प्रतिभूति आणि विनिमय मंडळ (एस.ई.बी.आय.) आणि भारतातील पारस्पारिक निधि-कोषांची संघटना (ए.एम.एफ.आय.), एकत्रितपणे. | भारतीय विमा नियामक आणि विकास प्राधिकरण (आय.आर.डी.ए.आय.) | अर्थ मंत्रालय | 3 |
| 87 | खालीलपैकी कोण, भारतीय विमा नियामक आणि विकास प्राधिकरण (आय.आर.डी.ए.आय.) द्वारा विनियमित केले जात नाही? | तृतीय-पक्ष प्रशासक (टी.पी.ए.) | विमा दलाल | चालू खाते-बचत खाते (सी.ए.एस.ए.) प्रतिनिधी | निगमित विमा-प्रतिनिधी | 3 |
| 88 | खालील विधानांपैकी कोणते एक, बरोबर आहे? | विमा नियमनाचा मुख्य हेतू, पॉलिसी-धारकांच्या हितांचे संरक्षण करणे, हा आहे. | भारतीय विमा नियामक आणि विकास प्राधिकरण (आय.आर.डी.ए.आय.) यांच्या द्वारे तयार करण्यात आलेले विनियम, हे, याची खात्री करण्याकरिता आहेत, कि, विमा कंपन्या आर्थिकदृष्ट्या सशक्तच नव्हेत तर सामाजिकदृष्ट्या जबाबदार संघटना असाव्यात. | विमा हा संपूर्णपणे कायदेशीर करार आहे, जो, भारतीय करार कायदा आणि देशातील इतर कायद्यांमधील तरतूदींचे अनुपालन करतो. | भारतीय विमा नियामक आणि विकास प्राधिकरण (आय.आर.डी.ए.आय.), हे, कंपन्यांचे नियमन, त्यांच्या नोंदणीपासून करते, आणि त्यांचे प्रमुख कार्यकलाप, जसे, गुंतवणूक, लेखा, इत्यादि, यांच्यावर देखरेख करते. | 1 |
| 89 | विमा-विनियमनाचा मुख्य हेतू काय आहे? सर्वाधिक योग्य उत्तर निवडा. | लोकसंख्येच्या ग्रामीण क्षेत्रे आणि दुर्बल घटकांना पुरेसे विमा संरक्षण मिळते आहे, याची खात्री करणे. | विमा कंपन्या पुरेसा नफा मिळवित आहेत, जेणे करुन, त्या दीर्घकाळ टिकून राहतील, याची खात्री करणे. | भारताच्या सर्व नागरिकांना विमा-संरक्षण प्रसारित केले जात आहे, याची खात्री करणे. | पॉलिसी-धारकांच्या हितांचे संरक्षण करणे. | 4 |
| 90 | खालील संस्थांपैकी कोणती एक, भारतातामध्ये, वैयक्तिक विमा-प्रतिनिधी म्हणून काम करण्याकरिता परवाना जारी करु शकते? | अर्थ मंत्रालय | भारत सरकार | भारतीय आयुर्विमा विमा महामंडळ (एल.आय.सी.) आणि साधारण विमा महामंडळ (जी.आय.सी.), संयुक्तपणे. | भारतीय विमा नियामक आणि विकास प्राधिकरण (आय.आर.डी.ए.आय.) | 4 |
| 91 | खालील संस्थांपैकी कोणती एक, भारतातील भांडवली बाजाराला विनियमित करत असते? | भारतीय रिजर्व्ह बँक (आर.बी.आय.) | भारतीय प्रतिभूति आणि विनिमय मंडळ (एस.ई.बी.आय.) | भारतीय विमा नियामक आणि विकास प्राधिकरण (आय.आर.डी.ए.आय.) | भारतातील पारस्पारिक निधि-कोषांची संघटना (ए.एम.एफ.आय.) | 2 |

| S. No. | Question Body | Alternative-1 | Alternative-2 | Alternative-3 | Alternative-4 | Correct Alternative |
|---|---|---|---|---|---|---|
| 92 | खालील संस्थांपैकी कोणती एक, भारतातील बँकांना विनियमित करत असते? | भारतीय रिजर्व्ह बँक (आर.बी.आय.) | भारतीय प्रतिभूति आणि विनिमय मंडळ (एस.ई.बी.आय.) | भारतीय विमा नियामक आणि विकास प्राधिकरण (आय.आर.डी.ए.आय.) | भारतातील पारस्पारिक निधि-कोषांची संघटना (ए.एम.एफ.आय.) | 1 |
| 93 | तृतीय-पक्ष प्रशासक (टी.पी.ए.), खालीलपैकी कोणती संस्थेद्वारा विनियमित केले जातात? | जीवन विमा परिषद आणि साधारण विमा परिषद, संयुक्तपणे. | भारतीय विमा नियामक आणि विकास प्राधिकरण (आय.आर.डी.ए.आय.) | भारतीय विमा दलाल संघटना | अर्थ मंत्रालय | 2 |
| 94 | खालील पैकी कोणता, देशातील मूलभूत विमा कायदा आहे, जो, भारतातील विमा व्यवसायाचे नियंत्रण करतो? | विमा कायदा, १९३८. | विमा नियामक आणि विकास प्राधिकरण (आय.आर.डी.ए.) कायदा, १९९९. | ठेव विमा व पत हमी महामंडळ कायदा, १९६१. | सार्वजनिक उत्तरदायित्व कायदा, १९९१. | 2 |
| 95 | ज्या विमा-प्रतिनिधीकडे, आयुर्विमा-कर्ता, साधारण विमा-कर्ता, आणि आरोग्य विमा-कर्ता, अशा तिघांच्या कडे काम करण्यासाठी परवाना आहे, त्यांना --- म्हणतात. | दलाल | निगमित विमा-प्रतिनिधी | तृतीय-पक्ष प्रशासक (टी.पी.ए.) | संमिश्र विमा प्रतिनिधी | 4 |
| 96 | विमा उद्योग विनियमित आणि विकसित करण्याकरिता, वर्ष: २००० मध्ये, --- ची स्थापना, एक स्वतंत्र प्राधिकरण म्हणून, करण्यात आली. | भारतीय रिजर्व्ह बँक (आर.बी.आय.) | भारतीय प्रतिभूति आणि विनिमय मंडळ (एस.ई.बी.आय.) | विमा नियामक आणि विकास प्राधिकरण (आय.आर.डी.ए.) | भारतातील पारस्पारिक निधि-कोषांची संघटना (ए.एम.एफ.आय.) | 3 |
| 97 | खालील संस्थांपैकी कोणत्या एकीने, पॉलिसी-धारकांच्या हितांचे संरक्षण करण्याकरिता विनियम विहित केलेले आहेत, जे, विमा-कर्ता तसेच मध्यस्थ, या दोघांच्याही वर कर्तव्ये म्हणून निर्धारित केलेले आहेत? | आयुर्विमा परिषद आणि साधारण विमा परिषद, संयुक्तपणे. | भारतीय पॉलिसी-धारकांची संघटना (पी.ए.आय.) | भारतीय विमा नियामक आणि विकास प्राधिकरण (आय.आर.डी.ए.आय.) | आयुर्विमा महामंडळ (एल.आय.सी.) आणि साधारण विमा महामंडळ (जी.आय.सी.), संयुक्तपणे. | 3 |
| 98 | खालीलपैकी कोणत्या कायद्यात विमा कंपन्यांच्या कामकाजाचे निरीक्षण व नियंत्रण करण्यासाठी तरतुदी आहेत? | विमा नियामक आणि विकास प्राधिकरण (आय.आर.डी.ए.) कायदा, १९९९. | ठेव विमा व पत हमी महामंडळ कायदा, १९६१. | सार्वजनिक उत्तरदायित्व कायदा, १९९१. | विमा कायदा, १९३८. | 1 |
| 99 | जर, विमा संस्था, अशा प्रस्तावकांना स्विकारत असेल, जे एका मोठ्या जोखीमेला सामोरे जात आहेत किंवा विमा-योग्य नाहीत, परंतु, त्यांच्या प्रत्यक्ष स्थितीविषयी किंवा परिस्थितीविषयी माहिती लपवित आहेत किंवा चुकीचा देत आहेत, जेणे करुन, त्यांना विमा मिळेल, तर, हे, --- म्हणून ओळखले जाईल. सर्वाधिक योग्य पर्याय निवडा. | विमा-अवलोकन | प्रतिकूल निवड | जोखीम-अंकन-त्रुटी | प्रस्ताव पुनरावलोकन | 3 |
| 100 | विमा कायदा, --- रोजी लागू झाला. | १ जून, १९३८ | १ जुलै, १९३८ | १ जून, १९३९ | १ जुलै, १९३९ | 3 |
| 101 | विमा नियामक आणि विकास प्राधिकरण (आय.आर.डी.ए.) ची स्थापना --- या वर्षी, विमा नियामक आणि विकास प्राधिकरण (आय.आर.डी.ए.) कायदा, १९९९, याच्या अंतर्गत करण्यात आली. | १९९९ | २००० | २००२ | २००३ | 2 |
| 102 | एक विमा पॉलिसी घेण्याकरिता प्रलोभन म्हणून, वजावटींचा वापर करण्याकरिता, विमा कायदा, १९३८, --- च्या अंतर्गत प्रतिबंध करतो. | अनुच्छेद ३८ | अनुच्छेद ४१ | अनुच्छेद ४५ | अनुच्छेद ६४-व्ही.बी. | 2 |
| 103 | विमा-पॉलिसींच्या नाम-निर्देशनाकरिता नियम, विमा कायदा, १९३८, --- च्या अंतर्गत, निर्देशित करतो. | अनुच्छेद ३९ | अनुच्छेद ४१ | अनुच्छेद ४५ | अनुच्छेद ६४-व्ही.बी. | 1 |
| 104 | एका निर्देशित व्यक्तीची, किमान शैक्षणिक पात्रता --- आहे. | दहावी | बारावी | पदवीधर | पदव्युत्तर | 2 |
| 105 | एका विमा-कर्त्यांचे एक विमा-प्रतिनिधी म्हणून नियुक्ती इच्छिणाऱ्या, एका अर्जदारांना, एक अर्ज, --- या प्रपत्रामध्ये, --- यांच्याकडे सादर करावा लागेल. | I-ए, नियुक्त अधिकृत | ए.I-ए, अपीलीय अधिकारी | I-बी, नियुक्त अधिकृत | I-बी, अपीलीय अधिकारी | 1 |

| S. No. | Question Body | Alternative-1 | Alternative-2 | Alternative-3 | Alternative-4 | Correct Alternative |
|---|---|---|---|---|---|---|
| 106 | एकात्मिक तक्रार-व्यवस्थापन-प्रणाली (आय.जी.एम.एस.), --- द्वारे सुरु करण्यात आलेली आहे. | भारतीय पॉलिसी-धारक संघटना | भारतीय विमा नियामक आणि विकास प्राधिकरण (आय.आर.डी.ए.आय.) | आयुर्विमा परिषद | भारत सरकार | 2 |
| 107 | खालील पैकी कोणता एक, एका वैध ग्राहक-तक्रारीकरिता आधार होऊ शकतो? | दुकानदार, वस्तुवर कांहीही सवलत देत नाहीत. | दुकानदाराने आकारलेली किंमत, ही, आवरणावरील कमाल किरकोळ किंमत (एम.आर.पी.) याच्या अनुसार आहे. | दुकानदार, एक ठराविक उत्पादन देण्यात, अपयशी ठरले आहेत. | ग्राहकाने खरेदी केलेल्या वस्तू, एका किंवा अधिक दोषांनी युक्त आहेत. | 4 |
| 108 | खालील पैकी कोणता एक, एका वैध ग्राहक-तक्रारीकरिता आधार होऊ शकत नाही? | दुकानदाराने आकारलेली किंमत, ही, आवरणावर दाखविण्यात आलेल्या किंमतीपेक्षा अधिक आहे. | ग्राहकाने खरेदी केलेल्या वस्तू, एका किंवा अधिक दोषांनी युक्त आहेत. | दुकानदार, एक ठराविक उत्पादन देण्यात, अपयशी ठरले आहेत. | एक अनुचित व्यवसाय-पद्धती किंवा प्रतिबंधात्मक व्यवसाय-पद्धती स्वीकारण्यात आलेली आहे. | 3 |
| 109 | खालील पैकी कोण, विमा उद्योगामधील, तक्रार निवारणावर देखरेख करण्याचे एक साधन आहे? | राष्ट्रीय आयोग | लोकपाल | एकात्मिक तक्रार-व्यवस्थापन प्रणाली (आय.जी.एम.एस.) | राज्य आयोग | 3 |
| 110 | खालील ग्राहक-तक्रार-निवारण-संस्थांपैकी कोणत्या एकाला, एखाद्या दिवाणी न्यायालयाचे अधिकार असतात? | जिल्हा मंच | राज्य आयोग्य | राष्ट्रीय आयोग | वरील पैकी सर्व. | 4 |
| 111 | खालील ग्राहक-तक्रार-निवारण-संस्थांपैकी कोणत्या एकाला, राज्य आयोगावर पर्यवेक्षकीय अधिकारक्षेत्र कार्यक्षेत्र असते? | जिल्हा मंच | राष्ट्रीय आयोग | लोकपाल | वरील पैकी कोणतेही नाही. | 2 |
| 112 | खालील पैकी कोण एक, विवादाच्या परिस्थितीमध्ये, विमा-कृत व्यक्ती आणि विमा-कर्ता यांच्या परस्पर सहमतीने, संदर्भाच्या अटींमध्ये, एक मध्यस्थ आणि समुपदेशक म्हणून काम करु शकतात? सर्वाधिक योग्य पर्याय निवडा. | विमा प्रतिनिधी | लोकपाल | विमा-कर्ता | विमा दलाल | 2 |
| 113 | जर, एक ग्राहक, जिल्हा मंचाने दिलेल्या आदेशामुळे, व्यथित असतील, तर, ते कोणाकडे, अशा आदेशाविरुद्ध आवाहन-पत्र दाखल करु शकतात? | राज्य आयोग | राष्ट्रीय आयोग | लोकपाल | आवाहन-पत्र करता येणार नाही. | 1 |
| 114 | जर, एक ग्राहक, राज्य आयोगाने दिलेल्या आदेशामुळे, व्यथित असतील, तर, ते कोणाकडे, अशा आदेशाविरुद्ध आवाहन-पत्र दाखल करु शकतात? | जिल्हा मंच | राष्ट्रीय आयोग | लोकपाल | आवाहन-पत्र करता येणार नाही. | 2 |
| 115 | खालील कायद्यांपैकी कोणता एक, भारतामध्ये, उपभोक्त्यांच्या विवादांच्या निवारणाकरिता, ग्राहक-परिषदा आणि अन्य प्राधिकरणांच्या स्थापनेची तरतूद करतो? | विमा कायदा, १९३८. | विमा नियामक आणि विकास प्राधिकरण (आय.आर.डी.ए.) कायदा, १९९९. | बँकिंग नियमन कायदा, १९४९. | ग्राहक संरक्षण (सुधारणा) कायदा, २००२. | 4 |
| 116 | खालील पैकी कोणत्या एकाला, राज्य आयोगावर पर्यवेक्षकीय अधिकार-क्षेत्र असते? | जिल्हा मंच | राष्ट्रीय आयोग | विमा-लोकपाल | वरील पैकी कोणतेही नाही. | 2 |
| 117 | अशी कमाल रक्कम किती असते, जिचा निवाडा, एखाद्या तक्रारीच्या प्रकरणामध्ये, विमा-लोकपाल देऊ शकतात? | रुपये १० लाखांपर्यंत | रुपये २० लाखांपर्यंत | रुपये ५० लाखांपर्यंत | रुपये १ कोटींपर्यंत | 2 |
| 118 | एका ग्राहक न्यायालयाकडे एक तक्रार दाखल करण्याच्या प्रक्रियेच्या संदर्भात, खालील विधानांपैकी कोणते एक, चूक आहे? | तक्रारकर्त्यांशिवाय अन्य कोणीही, राज्य आयोग किंवा राष्ट्रीय आयोग यांच्याकडे तक्रार दाखल करु शकत नाहीत. | राज्य आयोग किंवा राष्ट्रीय आयोग यांच्याकडे तक्रार दाखल करण्याकरिता, कांहीही शुल्क नसते. | तक्रार, व्यक्तिशः दाखल करता येते, किंवा टपालाद्वारे सुद्धा पाठविता येते. | एक तक्रार दाखल करण्याच्या हेतु करिता, कोणत्याही वकिलाची आवश्यकता नसते. | 1 |

| S. No. | Question Body | Alternative-1 | Alternative-2 | Alternative-3 | Alternative-4 | Correct Alternative |
|---|---|---|---|---|---|---|
| 119 | ग्राहक संरक्षण (सुधारणा) कायदा, २००२, नुसार, खालील पैकी कोण, 'ग्राहक' या व्याख्येत समाविष्ट केले जात नाही? | कोणतीही व्यक्ती, जी, कोणतीही वस्तू, एक मोबदला देऊन, खरेदी करते, आणि अशा वस्तूंचे कोणीही वापरकर्ता, यात समाविष्ट असतील. | कोणतीही व्यक्ती, जी, कोणतीही सेवा, एक मोबदला देऊन, भाड्याने घेते, किंवा वापर करते. | कोणतीही व्यक्ती, जी, कोणतीही सेवा, घेते, आणि अशा सेवेचे लाभार्थी देखील आहे. | एक व्यक्ती, जी, पुनर्विक्री करिता किंवा व्यावसायिक उद्देश्यांकरिता, वस्तू प्राप्त करते. | 4 |
| 120 | खालील शिष्टाचारांपैकी कोणता एक, शिफारशींच्या संदर्भात, चूक आहे, जो, विमा-लोकपालाने अनुसरणे, आवश्यक आहे? | अशी एखादी तक्रार प्राप्त झाल्याच्या ६ महीन्यांच्या आत, शिफारशी केल्या गेल्या पाहिजेत. | तक्रारदार आणि विमा कंपनी, अशा दोघांकडेही, प्रति-लिपी पाठविल्या गेल्या पाहिजेत. | अशा शिफारशी प्राप्त झाल्याच्या १५ दिवसांच्या आत, तक्रारदाराद्वारे, लिखित स्वरुपात, शिफारशी स्वीकारल्या गेल्या पाहिजेत. | विमा-कृत व्यक्ती द्वारे, स्वीकृति-पत्राची एक प्रत, विमा-कर्त्याला पाठविली गेली पाहिजे. | 1 |
| 121 | जर एखादे पॉलिसी-धारक, राष्ट्रीय आयोगाकडे तक्रार दाखल करु इच्छित असतील, तर, किती रकमेचे शुल्क, त्यांना अदा करावे लागेल? | रुपये १००/-. | दाव्याच्या रकमेच्या २.५% किंवा रुपये ५००/-, यांपैकी जे कमी असेल ते. | दाव्याच्या रकमेच्या १%. | राष्ट्रीय आयोगाकडे उपभोक्ता-तक्रार दाखल करण्याकरिता, कांहीही शुल्क अदा करावे लागत नाही. | 4 |
| 122 | खालील पैकी कोणते एक, विम्याच्या तक्रारींच्या माहितीचा एक केंद्रीय संग्राहक आहे? | राष्ट्रीय आयोग | लोकपाल | एकात्मिक तक्रार-व्यवस्थापन प्रणाली (आय.जी.एम.एस.) | राज्य आयोग | 3 |
| 123 | खालील उपभोक्ता-तक्रार-निवारण-संस्थांपैकी कोणती एक, जिल्हा-मंचाकडून आलेले आवाहन-पत्र स्विकारते? | राज्य आयोग | राष्ट्रीय आयोग | भारतीय विमा नियामक आणि विकास प्राधिकरण (आय.आर.डी.ए.आय.) | आवाहन-पत्र करता येणार नाही. | 1 |
| 124 | खालील उपभोक्ता-तक्रार-निवारण-संस्थांपैकी कोणती एक, कोणत्याही राज्य-आयोगाने दिलेल्या निवाड्यांच्या विरुद्ध केलेले आवाहन-पत्र स्विकारते? | जिल्हा मंच | राष्ट्रीय आयोग | भारतीय विमा नियामक आणि विकास प्राधिकरण (आय.आर.डी.ए.आय.) | आवाहन-पत्र करता येणार नाही. | 2 |
| 125 | जर एखादे पॉलिसी-धारक, एखाद्या विमा कंपनीकडून, एखाद्या तक्रारीकरिता, रुपये २० लाखापर्यंत नुकसान-भरपाई मिळवू इच्छित असतील, तर, ते कोठे तक्रार दाखल करु शकतात? सर्वात योग्य पर्याय निवडा. | जिल्हा मंच | राज्य आयोग्य | राष्ट्रीय आयोग | भारतीय विमा नियामक आणि विकास प्राधिकरण (आय.आर.डी.ए.आय.) | 1 |
| 126 | खालील पैकी कोणता एक, सेवा-गुणवत्तेचा एक थेट निर्देशक नाही? | विश्वसनीयता | समानुभूती | खात्री | विक्री माहिती | 4 |
| 127 | खालीलपैकी कोणते एक, ग्राहक आजीवन-मूल्याकरिता एक सहयोगी नाही? | ऐतिहासिक | वर्तमान | संभाव्य | प्रत्याशित | 4 |
| 128 | आय.जी.एम.एस. (I.G.M.S.) करिता बरोबर विस्तारित रुप निवडा. | इंडो-जर्मन मॅनेजमेंट स्कूल | इंटीग्रेटेड गव्हर्नमेंट मॅनेजमेंट सिस्टम | इंडियन जिनोम मॅपिंग स्किम | इंटीग्रेटेड ग्रिएव्हन्स मॅनेजमेंट सिस्टम | 4 |
| 129 | --- या, पॉलिसी-धारकांच्या तक्रारी आणि गाऱ्हाणी, प्रभावीपणे सोडविण्यासाठी असलेले नियम आणि विनियम यांचा एक संच असतात, ज्या, नियम आणि मार्गदर्शक-सूत्रे निश्चित करतात. | तक्रारी हाताळणाऱ्या प्रक्रिया | तक्रार-निवारण प्रक्रिया | जोखीम-तक्रार प्रक्रिया | नुकसान-तक्रार प्रक्रिया | 2 |
| 130 | सार्वजनिक तक्रारींचे निवारण नियमावली, 1998, म्हणून ओळखली जाणारी नियमावली, --- यांनी तयार केली. | भारतीय विमा नियामक आणि विकास प्राधिकरण (आय.आर.डी.ए.) | गैर-बँकिंग वित्त कंपनी (एन.बी.एफ.सी.) | भारतीय प्रतिभूति आणि विनिमय मंडळ (एस.ई.बी.आय.) | केंद्र सरकार | 4 |
| 131 | अशा निर्णयाला, --- च्या समोर, याचिकेच्या मार्गाने आव्हान दिले गेल्यास, अभिहस्तांकन किंवा अंतरण, कारणांसहित, पॉलिसी-धारकाला, लेखी स्वरुपात कळवावे लागते. | तक्रार-निवारण प्राधिकरण | ग्राहक-निवारण प्राधिकरण | विक्रेता-निवारण प्राधिकरण | प्रशासकीय निवारण प्राधिकरण | 1 |

| S. No. | Question Body | Alternative-1 | Alternative-2 | Alternative-3 | Alternative-4 | Correct Alternative |
|---|---|---|---|---|---|---|
| 132 | विमा-लोकपालाकडे, --- च्या अंतर्गत संपर्क साधून, विमा-कृत व्यक्ती विवादांचे निराकरण करु शकतात. | तक्रारी हाताळणारी प्रक्रिया | तक्रार-निवारण प्रक्रिया | जोखीम-तक्रार प्रक्रिया | सार्वजनिक तक्रार निवारण नियमावली | 4 |
| 133 | उपभोक्ता संरक्षण कायद्याचा मुख्य उद्देश, खालील पैकी कोणता आहे?<br>a) पॉलिसी-धारकांचे हित संरक्षित करणे.<br>b) गुंतवणूकदारांचे हित संरक्षित करणे.<br>c) उपभोक्त्यांच्या तक्रारींकरिता, एक साधे, गतिमान, आणि स्वस्त निवारण, प्रदान करणे. | फक्त (i) बरोबर आहे. | दोनही: (i) आणि (ii), बरोबर आहेत. | फक्त (iii) बरोबर आहे. | दोनही: (i) आणि (iii), बरोबर आहेत. | 3 |
| 134 | "सार्वजनिक तक्रार निवारण नियमावली, 1998" --- या दिवशी अंमलात आली. | १२ ऑक्टोबर, १९९१ | ११ नोव्हेंबर, १९९८ | १३ डिसेंबर, १९९७ | १४ सप्टेंबर, १९८३ | 2 |
